| CNR No. MHJN070009112021 | **नियमित दिवाणी दावा नं. १०६/२०२१ मधील**<br>**नि. क्र. २२ खालील आदेश**<br>लक्ष्मण रंगनाथ गायके व इ. वि.<br>रमेश रामदास काकडे |
|---|---|

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन असे की, सदर दावा टाईप करताना दाव्यातील क्लेम क्लॉज मध्ये वादी क्र.१ च्या १४ आर. व क्र.२ च्या १ आर. असे एकुण १५ आर. अशी दुरुस्ती तसेच दाव्याच्या परिच्छेद क्र.१ मध्ये शेवटची ओळ १६ आर. ऐवजी वादी क्र.१ यांची १४ आर. व क्र.२ यांची १ आर. अशी एकूण १५ दुरुस्ती करणेची आहे. तसेच परिच्छेद क्र.६ ओळ क्र.२ मध्ये १६ आर. ऐवजी वादी क्र.१ यांची १४ आर. व क्र.२ यांची १ आर. अशी एकूण १५ आर. जमीन दुरुस्ती करणेची आहे. उपरोक्त दुस्ती कारकुनी स्वरुपाची असल्यामुळे दाव्यावर कोणताही बदल घडणार नाही. करीता अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन सदर अर्ज ऑगस्ट २०२२ पासून पुराव्यासाठी प्रलंबित असून वादी हे जाणीवपूर्वक पुरावा मा. न्यायालयात देत नसून फक्त प्रकरण लांबणीवर टाकून प्रतिवादी यांना त्रास देण्याचा हेतु

आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा व वादी यांना र.रु. दोन हजार कॉस्ट करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा हा वाद मिळकतीमधील अतिक्रमण दुर करुन अतिक्रमित क्षेत्र प्रतिवादी यांच्या ताब्यातून वादी यांना मिळण्याचा आदेशासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. वादी यांनी दावा तयार करतेवेळी झालेल्या टंकलेखनामधील चुक दुरुस्ती करीता सदरचा अर्ज केला आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच त्यातून वादीने कोणतीही नवीन मागणी केलेली नाही. सदर दुरुस्ती परवानगी दिलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यांना याकामी सदर दुरुस्तीबाबत अतिरिक्त लेखी म्हणणे देणेस व पुरावा करणेस मुभा असणार आहे. सदर दुरुस्ती ही सदर दावा हा गुणदोषांवर निकाली करण्याकरीता आवश्यक आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की दावा हा दि.१६/०९/२०२१ रोजी दाखल झालेला आहे. परंतु सदरचा अर्ज हा वादी यांनी दि.२५/०४/२०२३ रोजी म्हणजेच साधारण दिड वर्षांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना खर्च देऊन वादी यांनी केलेला विलंब भरुन काढता येईल. सबब, न्यायाच्या हितामध्ये पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज निशाणी २२ प्रतिवादी यांना र.रु. २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना आदेशीत करण्यात येते की सदर अर्जात नमूद दुरुस्ती ही पुढील तारखेच्या आधी अथवा १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्ती प्रत न्यायालयात हजर करावी.

APARNA DAYANAND GADE
Digitally signed by APARNA DAYANAND GADE
Date: 2023.06.21 16:01:46 +0530

दिनांकः- २१/०६/२०२३.

(अपर्णा डी. गाडे )
दिवाणी न्यायाधीश (क. स्तर ),
जाफ्राबाद.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ.फाईल मधील शब्द न शब्द मुळ आदेश प्रमाणे आहे.

स्वाक्षरित/—
(अहेमद आय.शेख)

*दिनांक : २१/०६/२०२३* *लघुलेखक*